# अर्भक प्रकरणात खासगी रुग्णालयांची झाडाझडती

## महापालिकेचे डॉक्टर पाच रुग्णालयांत धडकले

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**नागपूर :** शहरातील उच्चभ्रूची वस्ती असलेल्या 'क्वेटा कॉलनी' परिसरात बुधवारी दुपारी कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर पाच अर्भक सापडल्यानंतर महापालिकेच्या आरोग्य विभागाने रात्री परिसरातील पाच रुग्णालयांची झाडाझडती घेतली. अर्भके एखाद्या खासगी रुग्णालयातून येथे फेकण्यात आली असावी असा संशय आहे.

उपराजधानीत साडेसहाशे ते सातशेच्या जवळपास लहान-मोठी रुग्णालये आहेत. यापैकी शंभर ते दीडशे स्त्रीरोग व प्रसूती रुग्णालये आहेत. या सर्व खासगी रुग्णालयांमध्ये नियमांचे पालन होत असल्याचा दावा रुग्णालय प्रशासनासह स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ज्ञांच्या संघटनांकडून केला जातो. परंतु बुधवारी क्वेटा कॉलनी परिसरात अर्भके सापडल्याने व संशयाची सुई महापालिकेच्या अधिकाऱ्यांसह पोलिसांकडून खासगी रुग्णालयांकडे वळली. त्यामुळे खासगी रुग्णालये रडारवर आली आहेत. दरम्यान, पुण्याच्या आरोग्य संचालनालयानेही या घटनेची दखल घेत नागपुरातील महापालिकेच्या आरोग्य विभागासह आरोग्य उपसंचालक कार्यालयाकडून या प्रकरणाची भ्रमणध्वनीवर माहिती घेतली व तातडीने अहवालही सादर करण्याची सूचना केली. महापालिकेने घटनेचे गांभीर्य पाहून तातडीने रात्रीच परिसरातील रुग्णालयाची तपासणी सुरू केली. शिवाय जैविक कचऱ्याची विल्हेवाट तसेच रुग्णालयातील गर्भपाताच्या नोंदणीसह इतरही माहिती गोळा केली जात आहे. त्यामुळे या प्रकरणात खासगी रुग्णालयांचा सहभाग आढळतो काय? याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

> "कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर सापडलेली अर्भके परिसरातील कुठल्या खासगी रुग्णालयातून आली असावी याबाबत शोध घेतला जात आहे. त्यासाठी प्रसूतीगृह व रुग्णालयाची तपासणी मोहीम हाती घेतली आहे."
> – डॉ. नरेंद्र बहिरवार, मुख्य वैद्यकीय अधिकारी, नागपूर महापालिका.

**गर्भपाताचे नियम**

मार्च २०२१ रोजी कायद्यात केलेल्या सुधारणेनंतर विशिष्ट परिस्थितीत गर्भपात करण्यासाठीचा कालावधी आता २४ आठवडे करण्यात आला आहे. गर्भवतीच्या जीवाला धोका असेल, जन्माला येणाऱ्या बाळाला व्यंग असेल, महिलेला बलात्कारातून गर्भधारणा झाली असेल यापैकी कोणतेही एक कारण गर्भपातासाठी असणे आवश्यक आहे. वैद्यकीय मंडळाची परवानगीही गरजेची असते. गर्भातील अर्भकाला विकृती किंवा व्यंग असेल तर अशा प्रकरणात गर्भपाताची कमाल मर्यादा लागू होत नाही. २० आठवड्यांपर्यंत गर्भपात करण्यासाठी एका डॉक्टरचा आणि गर्भावस्थेच्या २० ते २४ आठवड्यापर्यंत गर्भपात करण्यासाठी दोन डॉक्टरांचा सल्लाही कायद्यानुसार आवश्यक आहे.

# सनफ्लॉवर रुग्णालयाला १ लाखाचा दंड

### वैद्यकीय कचरा रस्त्यावर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** महापालिकेच्या उपद्रव शोध पथकाने बुधवारी धरमपेठ झोनमधील व्ही.आय.पी. रोड रामदासपेठमधील सनफ्लॉवर रुग्णालयावर वैद्यकीय कचऱ्याचा (बायो मेडिकल वेस्ट) निचरा योग्यपद्धतीने न केल्याने १ लाख रुपयाचा दंड ठोठावण्यात आला.

रुग्णालयातील वैद्यकीय कचरा गोळा करण्यासाठी महापालिकेने स्वतंत्र व्यवस्था केली आहे. रुग्णालयाकडून हा कचरा स्वीकारला जातो. मात्र शहरातील अनेक रुग्णालये या गाड्यांमध्ये कचरा न टाकता सारवजनिक ठिकाणी सामान्य कचऱ्यामध्ये वैद्यकीय कचरा टाकतात. सनफ्लॉवर रुग्णालयाने इतर कचऱ्यामध्ये वैद्यकीय कचरा टाकल्याची माहिती महापालिकेच्या पथकाकडे आल्याने त्यांनी त पासणीअंती ही कारवाई केली. याशिवाय धरमपेठ, व्हीसीए स्टेडियम सिव्हिल लाईन्स सदर येथील हँण्डलूम एक्सपोवर प्लास्टिक पिशवीच्या वापराबद्दल कारवाई करण्यात आली व ५ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला. अशीच कारवाई, कॉटन मार्केट येथील अमेसर ॲण्ड कंपनीवर करण्यात आली. त्याचप्रमाणे गांधीबाग झोनअंतर्गत गोळीबार चौक इतवारी येथील नानक प्लास्टिक आणि राजेश प्लास्टिक या दुकानांवर कारवाई करून १० हजार रुपये दंड वसूल केला.

# सचिन सोमकुंवर खून प्रकरणात दोघांना जन्मठेप

### तीन जण दोषमुक्त

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** धरमपेठच्या गोकुळपेठ बाजारात दिवसाढवळ्या गोळ्या झाडून हत्या करण्यात आलेल्या सचिन सोमकुंवर प्रकरणात जिल्हा सत्र न्यायाधीश एम. एस. आझमी यांनी बुधवारी दोन आरोपींना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली तर तीन आरोपींना दोषमुक्त केले. दोन फरार आरोपीविरुद्ध खटला चालवण्याचे आदेश दिले.

राजा ऊर्फ अमर दिलीप परतेकी (२८) आणि रोशन दिलीप परतेकी (२६) अशी जन्मठेप ठोठावलेल्या आरोपींची नावे असून ते सख्खे भाऊ आहेत. अंकेश अशोक उईके, प्रदीप पूरणदास उईके आणि अशपाक अहमद जुबेर अंसारी, अशी दोषमुक्त ठरवण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. अंकित राजकुमार पाली व सूरज रमेश गुप्ता अशी फरार आरोपींची नावे आहेत. २९ सप्टेंबर २०१६ रोजी दुपारी १.५० वाजताच्या सुमारास अंबाझरी हद्दीतील गोकूलपेठ बाजार परिसरात सूरज डोंगरे व त्याचा मित्र सचिन सोमकुंवर यांच्यावर आरोपींनी गोळ्या झाडल्या होत्या. यात सूरज हा जखमी झाला तर सचिनचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी सूरजने दिलेल्या तक्रारीवरून अंबाझरी पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला. तपास अधिकारी एस. एस. सुरोशे यांनी न्यायालयात आरोपपत्र दाखल केले होते. साक्षी पुराव्याअंती गुन्हा सिद्ध झाल्याने न्यायालयाने आरोपी राजा परतेकी व रोशन परतेकी यांना आजीवन कारावास व पाच हजार रुपये दंड, दंड न भरल्यास तीन महिने कारावास, तसेच कलम ३०७ मध्ये पाच वर्षांचा सश्रम कारावास व तीन हजार रुपये दंड, दंड न भरल्यास दोन महिने कारावास, अशी शिक्षा ठोठावली.

# ...तरच लेखन सकस -डॉ. शोभणे

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** भाषेचे सखोल ज्ञान व भरपूर वाचन केल्यानंतरच लेखनाचा विचार केला तरच लेखन सकस, परिपक्व व परिपूर्ण होते, असा मोलाचा सल्ला विदर्भ साहित्य संघाचे कार्याध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांनी दिला.

साहित्य विहार संस्थेच्यावतीने अभिनव पद्धतीने मराठी भाषा गौरवदिन साजरा केला त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला डॉ. दत्ता हरकरे आणि ज्येष्ठ गायक अशोक गोकर्ण उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या सदस्यांनी प्रस्थापित कवींच्या रचनांचे सुंदर गायन सादर केले.

बांग्ला-मराठी शब्दकोश निर्मात्या मंदिरा गांगुली, प्रमोदिनी तापस, मीनल जोशी, वीणा गानु यांचा यावेळी संस्कृत अभ्यासिका डॉ. मनीषा यमसनवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे भाषाविषयक धोरण सांगताना आशा पांडे म्हणाल्या, भाषा बहुपयोगी व बहुमूखी असली तर ती जनभाषा होते,समृद्ध होते. दत्ता हरकरे यांनी लतादीदींना श्रद्धांजलीपर 'अखरेचा हा तुला दंडवत' हे गीत सादर केले. सुरेश भटांच्या 'लाभले आम्हास भाग्य' या रचनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कवी ग्रेस यांची 'भय इथले संपत नाही' ही रचना जितेंद्र पटवर्धन यांनी सादर केली. साहित्य विहार कार्यकारिणी सदस्यासह अनेक सदस्यांनी सादर केलेल्या सुरेल रचना वाद्यांशिवायही उत्तम झाल्याचे मत डॉ. शोभणे ह्यांनी व्यक्त केले.

# विजेच्या धक्क्याने मुलाचा मृत्यू

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** घराच्या पहिल्या माळ्यावर खेळत असताना खाली पडलेल्या विजेच्या उघड्या तारेला स्पर्श झाल्याने १३ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना कपिलनगरात घडली. स्वयंम रामप्रसाद ठाकरे (खसाळा) हा ५ मार्चला घराच्या पहिल्या माळ्यावर खेळत असताना त्याच्या हाताला विजेच्या तारेचा स्पर्श झाला. विजेचा धक्का बसल्याने बेशुद्ध झालेल्या स्वयंमला उपचाराकरिता मेडिकल रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान ८ मार्चला स्वयंमचा मृत्यू झाला.

# 'समाजासाठी सेवा पुरवठादार म्हणून शैक्षणिक संस्थांची भूमिका महत्त्वाची'

### जे.डी. अभियांत्रिकीमध्ये प्राचार्यांची बैठक

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** सामाजिक समस्या सोडवण्यासाठी बहुविद्याशाखीय शिक्षण, आंतरविद्याशाखीय शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. समाजासाठी सेवा पुरवठादार म्हणून शैक्षणिक संस्थांची भूमिका महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (बाटू)चे कुलगुरू डॉ. के.व्ही. काळे यांनी केले.

बाटूशी संलग्नित जे.डी. अभियांत्रिकी महाविद्यालय आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या आयक्यूएसीच्या संयुक्त विद्यमाने नुकतीच प्राचार्यांची बैठक पार पडली. त्यात डॉ. काळे बोलत होते. बैठकीला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एस.आर. चौधरी, विज्ञान व तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. पी.बी. माहेश्वरी, बाटूचे कुलसचिव डॉ. एफ.बी. जोगी, डॉ. आर.एस. पावडे, डॉ. कल्पना पांडे, संस्थेचे अध्यक्ष संजय अग्रवाल, सचिव अजय अग्रवाल, संचालक प्रा. एस.एम. बंग, अविनाश दोरसटवार, प्राचार्य डॉ. श्रीकांत सोनेकर उपस्थित होते.

यावेळी डॉ. काळे यांनी विद्यापीठांकडून महाविद्यालयांना आवश्यक सर्व प्रकारची मदत करण्याचे आश्वासन दिले. तसेच महाविद्यालयांनी आपली जबाबदारी ओळखून समाजाला आवश्यक असे विद्यार्थी घडवावे, असे आवाहन करतानाच, यात प्राचार्यांची भूमिका महत्त्वाची असल्याचेही ते म्हणाले.

डॉ. चौधरी यांनी व्यावसायिक शिक्षणाच्या भवितव्यावर आपले विचार मांडले. सचिव अग्रवाल यांनी शाश्वत विकासाचे लक्ष्य साध्य करण्यासाठी बहुविद्याशाखीय, सर्वांगीण आणि मूल्याधारित शिक्षण देण्यासाठी सज्ज व्हावे, असे आवाहन केले. कार्यक्रमात सर्वच अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य उपस्थित होते.

**जाहिरात**

अल्पसंख्याक विकास विभाग अधिसूचना दि. ०१.०८.२०१७ अन्वये वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ८३(४)येथील तरतुदीनुसार त्रिसदस्यीय वक्फ न्यायाधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. सदर अधिनियमातील कलम ८३(४)(क)येथील तरतुदीनुसार "मुस्लीम कायद्याचे ज्ञान व आकलन असलेली एका व्यक्तीची" सदर न्यायाधिकरणावर एक सदस्य म्हणून नियुक्ती करावयाची आहे. त्यास अनुसरून या सदस्याची नियुक्ती करण्याच्या दृष्टीने निवड करण्याकरिता शासनाने एक समिती गठित केलेली आहे. सदर न्यायाधिकरणावर सदस्य म्हणून काम करण्यास इच्छुक असलेल्या उमेदवाराकडे पुढीलप्रमाणे पात्रता असणे आवश्यक आहे :-

१) या समितीद्वारे नियुक्त केल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरणाच्या सदस्याला मुस्लीम कायद्याचे ज्ञान व आकलन असणे आवश्यक असेल.
२) या समितीद्वारे नियुक्त केला जाणारा महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरणाचा सदस्य हा अल्पसंख्याक विकास विभागच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असेल.
३) या समितीद्वारे महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरणाचे सदस्य म्हणून नियुक्त केल्या जाणाऱ्या व्यक्तीचे त्याच्या नियुक्तीच्या वेळी ४५ वर्षांपेक्षा कमी वय नसावे.
४) या समितीद्वारे न्यायाधिकरणावर सदस्याची नियुक्ती करताना उर्दू भाषेचे समुचित ज्ञान असणाऱ्या व्यक्तीस प्राधान्य देण्यात येईल.
५) या समितीद्वारे नियुक्त सदस्याचा कार्यकाळ हा त्याने आपल्या पदावर प्रत्यक्ष रुजू झाल्याच्या दिनांकापासून ५ वर्षे असा असेल.
६) या समितीद्वारे नियुक्त केल्या जाणाऱ्या सदस्याला मासिक अंदाजे रु. १.०० लक्ष मानधन अनुज्ञेय असेल.
७) या समितीद्वारे नियुक्त केल्या जाणाऱ्या सदस्याला लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल व त्यांच्या सेवा त्यांना अनुज्ञेय असलेल्या सेवा नियमांद्वारे शासित केल्या जातील.

वर नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरणावर सदस्य म्हणून काम करण्यास इच्छुक असलेल्या व उपरोक्त पात्रता धारण करणाऱ्या इच्छुकांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. उपरोक्त पात्रता धारण करणाऱ्या इच्छुकांनी **दि. १५.०४.२०२२ पूर्वी निश्चितपणे पोहोचतील अशा बेताने अवर सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय (विस्तार), मुंबई - ४०००३२** यांच्याकडे सर्व वैयक्तिक तपशिलासह (Bio-Data) अर्ज सादर करावा. तद्नंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

वर नमूद केल्याप्रमाणे करण्यात आलेले कोणतेही किंवा सर्व अर्ज कोणतेही कारण न देता फेटाळण्याचे सर्व अधिकार शासनाकडे अबाधित आहेत.

सही/-
उपसचिव,
अल्पसंख्याक विकास विभाग

डीजीआयपीआर/२०२१-२२/५०८१

**SBI**
आयटी संपर्क केंद्र, भारतीय स्टेट बँक, ग्लोबल आयटी सेंटर,
कापस भवन, २रा मजला, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४

**शुध्दीपत्रक - ३**

कृपया भारतीय स्टेट बँकेच्या आउटबाउंड कॉन्टॅक्ट सेंटर टेक्नॉलॉजी स्टॅकची खरेदी दि. ०२.०२.२०२२ रोजीचे आरएफपी क्र. SBI/GITC/IT-CONTACT CENTRE/२०२१/२०२२/८२६ दिनांक: ०९.०३.२०२२ रोजीचे शुध्दीपत्रक - ३ बँकेच्या https://www.sbi.co.in या पोर्टलवर पहाता येऊ शकेल.

स्थळ: नवी मुंबई — उप महाव्यवस्थापक
दिनांक: ०९.०३.२०२२ — आयटी संपर्क केंद्र

**NAGPUR MUNICIPAL CORPORATION**
**Tender Notice**

Commissioner NMC invites e-tenders for the following work. These E-Tender can be download by the Registered Contractors of Nagpur Municipal Corporation e-tendering Portal (www.mahatenders.gov.in) The terms and conditions of e-tenders are available on e-tender Portal (www.mahatenders.gov.in) The sale and purchase of e-tenders can be done through internet.

Name of Department: - Public Works Department — Name of Head of Department :- Executive Engineer (Zone 08)

| Sr. No. | Name of the Work | Tender cost (In Rs.) | EMD (In Rs.) | Time Period (In Days) |
|---|---|---|---|---|
| 1 | Construction of Cement Concrete Road From H/o Sable To H/o Nakade At Hiwari Lay-out In Prabhag No. 23-D. | 3611229 | 36150 | 120 |

Note :- 1) Cost of Blank Tender form each Rs. 560/- 2) Class of Contractors : I to V 3) Tender Sale & Submission start date : 09.03.2022 4) Tender submission end date/sales end date : 24.03.2022 at 3.00 pm 5) Date of opening of Tender (if possible) : 25.03.2022 at 5.00 pm 6) Eligibility criteria and mode of Submission shall be as stated in uploaded tender document

Executive Engineer (Zone 08)
Nagpur Municipal Corporation

Advt No : 572/PR dt : 09/03/2022
RN/22/572

(Under Regulation 32 (b) of the Insolvency and Bankruptcy Board of India (Liquidation Process Regulation) 2016 (amended from time to time)
**Seam Industries Ltd (Company in Liquidation)**
CIN: U28120MH2005PLC153364

In furtherance of liquidation proceedings of Seam Industries Ltd (commenced vide NCLT order in CP (IB) 1620/MB/C-II/2017, dated 30th June 2021, Interalia appointing the undersigned as a Liquidator). The Liquidator, in terms of section 35 (1) (f) of the Insolvency and Bankruptcy Code, 2016 read with Regulation 32 and 33 of IBBI (Liquidation Process) Regulations 2016 (amended from time to time) invites Expression of Interest (EOI) for sale of Assets of Company in Slump Sale on "AS IS WHERE IS", "AS IS WHAT IS" "WHATEVER THERE IS" and "NO RECOURSE" Basis.

| Details of Assets | Manner of Sale | BLOCK | Reserve Price (Rs. In Crores) | Earnest Money Deposit (Rs. In Crores) | INCREMENTAL VALUE (Rs. In Lacs) |
|---|---|---|---|---|---|
| Sale of Assets of Seam Industries Ltd as per Regulation 32 (b) of IBBI Liquidation Process Regulations 2016 (Company engaged in manufacturing of power plant equipment and component and R&M designing and engineering) Consisting of, Land & Building As mentioned in below table at Plot K-55 and K-43, Butibori, Nagpur: Plant & Machinery lying at K-55 and K-43, Butibori, Nagpur on "AS IS WHERE IS", "AS IS WHAT IS" "WHATEVER THERE IS" and "NO RECOURSE" Basis. | SALE of Assets in Slump Sale in totality on 'AS IS WHERE IS", "AS IS WHAT IS", "WHATEVER THERE IS" and "NO RECOURSE" Basis | I | 30.00 | 3.00 | 5.00 |

Land & Building Details – Located at Plot K-55 and K-43, Butibori, Nagpur:

| Sr No. | Location | Asset Type | Asset Description | Area in Sq. Mtr |
|---|---|---|---|---|
| 1 | K-55 | Land | Plot No K-55, MIDC, Butibori. | 75138 |
| 2 | K-55 | Building | Factory Shed -1 | 4500 |
| 3 | K-55 | Building | Office Block | 340.76 |
| 4 | K-55 | Building | Factory Shed - 2 | 1440 |
| 5 | K-55 | Building | Factory Shed - 3 | 1440 |
| 6 | K-55 | Building | Lean to Roof | 1725 |
| 7 | K-43 | Land | Plot No K-43/2 | 16280 |
| 8 | K-43 | Land | Plot No K-16/2 | 8820 |
| 9 | K-43 | Land | Plot No K-16/2 (Part) | 5684 |
| 10 | K-43 | Building | Machine Shop | 1399.10 |
| 11 | K-43 | Building | Reare Shed of Machine Shop | 263.70 |
| 12 | K-43 | Building | Store & C.N.C Building | 744.90 |
| 13 | K-43 | Building | Office Building | 789.50 |
| 14 | K-43 | Building | Warehouse | 211.20 |
| 15 | K-43 | Building | Fitting & Piping Shed | 2880 |
| 16 | K-43 | Building | Lean to Roof | 293.60 |
| 17 | K-43 | Building | Presser Part Shed | 4640 |
| 18 | K-43 | Building | Plate Bending Shed (Welding & Hydraulic Pressing Shed) | 250.60 |

| | |
|---|---|
| Last date of submission of EOI and EMD | **16th March 2022 till 6:00 PM** |
| Factory Inspection date and time | **14th March 2022 and 15th March 2022 from 10:00 AM to 4:00 PM** |
| Date and time of E-Auction for qualified bidders | **17th March 2022 from 1:00 PM to 3:00 PM** |

- Interested applicants may refer to the complete terms and condition of EOI document available on https://ncltauction.auctiontiger.net
- The sale notice shall be read in conjunction with the EOI document containing brief of assets, eligibility criteria, EOI forms, terms and conditions of E-Auction available on website https://ncltauction.auctiontiger.net or through email: liquidator.seam@gmail.com, rupesh.c@subratamaity.com, sumit.m@subratamaity.com
  Contact office of Liquidator at: CA Rupesh Chopade - +91 8007573303 or Sumit Mengade - 7028158171.
- EOI documents should reach the office of liquidator physically at address: **Shop No 28 & 29, Plot No 25, Greenspace Royale CHS Ltd, Sector 7, Kamothe, Navi Mumbai, 410209** before 6:00 PM on 16th March 2022
- The Liquidator has right to extend, modify and cancel the any of the terms of EOI and E-Auction at any time.

Date: 10.03.2022
Place: Navi Mumbai

Subrata M Maity
Liquidator – Seam Industries Ltd
IBBI Reg. No: IBBI/IPA-001/IP-P00884/2017-2018/11481

**पंजाब नैशनल बैंक**
punjab national bank ...the name you can BANK upon!
सर्कल सस्त्र सेंटर, पीएनबी हाउस, किंग्सवे, नागपूर - 440001 फोन : 0712-6603753,6630484, ई मेल : cs6795@pnb.co.in

**सांकेतिक ताबा सुचना (नियम 8(1))**
**(अचल संपत्ती करीता)**

खालील हस्ताक्षरकर्ता हे पंजाब नॅशनल बँकेचे अधिकृत अधिकारी असुन त्यांनी सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल ॲसेट्स ॲन्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 आणि यासह वाचल्या जाणा-या सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट नियम 2002 च्या कलम 13(12) च्या अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन संबंधित कर्जदारांना सुचित करण्यात येते की, खालील दिलेल्या तारखेला मागणी सूचना दिली होती त्या सूचनेत नमूद केलेल्या रकमेची उक्त सूचना प्राप्त होणा-या तारखेपासून 60 दिवसांच्या आत परतफेड करण्यास सांगितले होते / नोटीस प्राप्त झाल्याच्या तारखेपासून.
कर्जदार रकमेची परतफेड करण्यास अपयशी ठरल्याने कर्जदार / जमानतदार व सर्व सामान्य जनतेला एतव्दारा सूचना देण्यात येते की खालील हस्ताक्षर कर्ता यांनी उपरोक्त नियमाचा 8 सह वाचल्या जाणा-या उपरोक्त कायद्याचा कलम 13(4) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन यात खालील वर्णन केलेल्या संपत्तीचा सांकेतिक ताबा घेतला आहे.
कर्जदारांनी लक्ष द्यावे की सेक्शन 13 च्या सब-सेक्शन (8) च्या प्रावधानानुसार मालमत्ता परत सोडविण्याकरिता उपलब्ध वेळेमध्ये आमंत्रित केले आहे.
विशेष करुन कर्जदार / जमानतदार तसेच आम जनतेला या व्दारा वरील संपत्तीच्या विषयी काहीही घेणे न करण्याकरीता ताकीद दिली जात आहे. तसेच पुढील संपत्तीचे व रक्कमेवरील व्याजाचे आणि अन्य खर्चाचे देणेघेणे पंजाब नॅशनल बँकच्या व्याजासह प्रभाराधीन राहील.

| अ. क्र. | शाखेचे नाव | कर्जदाराचे नाव | गहाण ठेवलेल्या संपत्तीचे विवरण | डिमांड नोटिस तारीख | कर्जाची बकाया रक्कम | ताबा घेण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | सर्कल शस्त्र सेंटर शाखा | 1) श्री. सुनिल दिवाकर पिंजरकर (कर्जदार / गहाणदार) आणि 2) श्रीमती सुनिता सुनिल पिंजरकर (सह-कर्जदार / गहाणदार) | सर्व 22 वर्ष जुना आरसीसी सुपरस्ट्रक्चर फ्लॅट नं. एम-102, क्षेत्रफळ 46.47 चौ.मी. तसेच 500 चौ. फु. "माँ दुर्गा" या नावाने असलेल्या इमारतीच्या मेझानाईन मजल्यावर, जमीनीचा अविभाजित हिस्सा नागपूर सुधार प्रन्यास प्लॉट नं. 1046, क्षेत्रफळ 464.515 चौ.मी. (5000.00 चौ.फु.) आणि प्लॉट नं. 1047, क्षेत्रफळ 464.515 चौ.मी (5000.00 चौ.फु.) दोन्ही संलग्न क्षेत्रफळ 929.03 चौ.मी. तसेच 10000.00 चौ.फु. नागपूर सुधार प्रन्यासची इंडस्ट्रियल एरिया आणि इंडस्ट्रियल बस्ती योजना (वाठोडा स्ट्रीट योजना) नंदनवन लेआऊट सिटी सर्वे नं. 219, शिट नं. 286, मौजा - नागपूर, मुन्सीपल हाउस नं. 1288 / 1046, वार्ड नं. 20, नंदनवन येथे स्थित, नागपूर. मालक : श्री. सुनिल दिवाकर पिंजरकर. चतुर्सिमा: पूर्व : प्लॉट नं. 1048, उत्तर : रोड, पश्चिम : प्लॉट नं. 1045, दक्षिण : प्लॉट नं. 1082, 1083 आणि 1084. | 09/11/2011 | रु. 23,41,514.17 अन्य व्याज आणि खर्च | 03/03/2022 |
| 2. | सर्कल शस्त्र सेंटर शाखा | 1) श्री. अजय जगदीशप्रसाद प्रजापती (कर्जदार), 2) श्री. संजय जगदीशप्रसाद प्रजापती आणि 3) श्री. जितेंद्र कमलेश शाहु (जमानतदार) | जमीनीचा सर्व भाग आणि तुकडा प्लॉट नं. 54, 1200 चौ.फु. (111.48 चौ.मी.) डॉ. बाबासाहेब मेमोरीयल को-ऑपरेटिव हाऊसिंग लिमी. चे लेआऊट, खसरा नं. 9 / 2, वार्ड नं. 42, सिटी सर्वे नं. 9, शिट नं. 741 / 9, पी.एच. नं. 17, मौजा - चिखली देव, नागपूर सुधार प्रन्यास, आणि मालक : श्री. अजय जगदीशप्रसाद प्रजापती आणि श्री. संजय जगदीशप्रसाद प्रजापती. चतुर्सिमा : पूर्व : तेजराम फुलवाले यांची फिल्ड, पश्चिम : रोड, उत्तर : प्लॉट नं. 53, दक्षिण : प्लॉट नं. 55. | 10/12/2021 | रु. 25,56,766.80 अन्य व्याज आणि खर्च | 05/03/2022 |
| 3. | सर्कल शस्त्र सेंटर शाखा | 1) श्री. मनिष किशनगोपाल शर्मा (कर्जदार / गहाणदार) आणि 2) श्रीमती भावना मनिष शर्मा सह-कर्जदार / गहाणदार) | सर्व भाग आणि तुकडा मलीक मकबुरा फ्रिहोल्ड जमीन प्लॉट नं. 267 खसरा नं. 46 आणि 49 चे मंजूर लेआऊट, मौजा चिखली (देवस्थान) सिटी सर्वे नं.. 185 / 178, शिट नं. 48 एकुण क्षेत्रफळ 111.39 चौ.मी. (1200 चौ.फु.), एनएमसी हाउस नं. 1098 / 267, वार्ड नं. 22, तुलसी नगर, नागपूर नागपूर महानगरपालिका आणि नागपूर सुधार प्रन्यास च्या हद्दीत, नागपूर श्री. मनिष किशनगोपाल शर्मा आणि श्रीमती भावना मनिष शर्मा च्या नावावर आहे. चतुर्सिमा : पूर्व : 9 मी रुंद रोड, उत्तर : प्लॉट नं. 268, पश्चिम :मौजा बिनाकी ची श्री. रामसुमेर बाबा ट्रस्ट जमीन, दक्षिण : प्लॉट नं. 266. | 06/12/2021 | रु. 90,69,438.78 अन्य व्याज आणि खर्च | 05/03/2022 |

दिनांक : 09 / 03 / 2022
स्थळ : नागपूर

अधिकृत अधिकारी,
पंजाब नॅशनल बँक

# 'क्रिप्टो' गुंतवणुकीच्या नावावर फसवणूक

### ६७ लाख उकळले

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** क्रिप्टो चलनात गुंतवणूक करण्यासाठी आकर्षक व्याज आणि दुप्पट रक्कम देण्याचे आमिष दाखवून देशभरातील गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याप्रकरणी पाचपावली पोलिसांनी चार आरोपींना गुन्हा नोंदवून अटक केली. अशोक लाडे (४९), रा. चेतक अपार्टमेंट, मंगल तिवारी (४२), रा. बाळाभाऊपेठ, रोशन राठोड (४०), रा. गोधननगर आणि धर्मेश पटेल (३६), रा. गुजरात अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. यापैकी तिवारी आणि पटेल या दोघांना दिल्लीहून अटक करण्यात आली. चौघांनाही न्यायालयाने १४ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

फॉरेक्स ट्रेडिंगअंतर्गत विविध कंपन्या आहेत. त्यात आरोपींनी क्रिप्टो करन्सीच्या वेगवेगळ्या कंपनीचे एजंट असल्याची बतावणी केली. सामान्य नागरिकांना आमिष दिले. दुप्पट रक्कम आणि आकर्षक व्याज देण्याची बतावणी करून सामन्यांचा विश्वास संपादन केला. त्यांच्या आमिषाला बळी पडत काहींनी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली. यासाठी ते दिल्ली, मुंबईसारख्या महानगरात सेमिनार घ्यायचे. या माध्यमातून ते लोकांना आकर्षित करीत होते. त्यांनी हितेश आकरे यांच्याकडून ६७ लाख ५९ हजार रुपये घेऊन त्यांची फसवणूक केली. याप्रकरणी आकरेच्या तक्रारीवरून पाचपावली पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपींना अटक केली. या प्रकरणाचा पुढील तपास शहर गुन्हेशाखा करीत आहे.

# नरखेड, काटोलमध्ये सहा रेल्वेगाड्या थांबणार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** रेल्वेने नागपूर जिल्ह्यातील काटोल आणि नरखेडमध्ये सहा रेल्वेगाड्यांना ६ महिन्यांसाठी प्रायोगिक तत्त्वावर थांबा देण्याचा निर्णय घेतला आहे.

डॉ. आंबेडकर नगर ते नागपूर एक्सप्रेस (साप्ताहिक) नरखेड येथे सकाळी ६.२७ वाजता पोहोचेल आणि सकाळी ६.२८ वाजता निघेल. नागपूर ते डॉ. आंबेडकर नगर एक्सप्रेस (साप्ताहिक) रात्री ८.०२ वाजता नरखेडला पोहोचेल आणि ८.०३ ला प्रस्थान करेल. चेन्नई सेंट्रल ते लखनऊ एक्सप्रेस (द्वि-साप्ताहिक) पहाटे ३.०३ वाजता काटोल येथे पोहोचेल आणि ३.०५ वाजता निघेल. लखनऊ ते चेन्नई सेंट्रल एक्सप्रेस (द्वि-साप्ताहिक) सकाळी ८.१७ वाजता काटोल येथे येईल आणि ८.१८ वाजता निघेल.

# विनयभंग करणाऱ्यास कारावास

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीला सत्र न्यायालयाने तीन वर्षे कारावास आणि दोन हजार रुपये दंड, दंड न भरल्यास दोन महिने कारावास, अशी शिक्षा ठोठावली. आकाश बाबाराव मेश्राम, (२४, रा. निलगाव, ता. कळमेश्वर), असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे.

आरोपीच्या गुन्ह्याचे स्वरूप गंभीर आहे. त्याला दया दाखवली गेली तर समाजात चुकीचा संदेश जाईल. त्यामुळे आरोपीला जास्तीत जास्त शिक्षा व्हावी, असा युक्तीवाद सरकारी वकील कल्पना पांडे यांनी न्यायालयापुढे केला. दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून न्यायालयाने आरोपीला शिक्षा ठोठावली.